RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक २] बुधवार, जानेवारी २, २०१९/पौष १२, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १ जानेवारी २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६**

क्रमांक परिनि-२०१८/प्र.क्र. ८७/वि. शि. -२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधि. क्र. ६) याच्या कलम ७१ चे पोट-कलम (२२) तसेच कलम ७२ चे पोट-कलम (१०) व कलम १३८ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, एखादे प्राधिकरण किंवा संस्था किंवा त्यांचे सदस्य यांच्याकडून, अथवा एखाद्या अधिकाऱ्याकडून झालेल्या हानीची किंवा नुकसानीची वसुली करण्याबाबतच्या कार्यपद्धतीशी संबंधित पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**सन २०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक २**

१. **संक्षिप्त नाव.—**या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (प्राधिकरण किंवा संस्था किंवा त्यांचे सदस्य यांच्याकडून अथवा एखाद्या अधिकाऱ्याकडून झालेल्या हानीची किंवा नुकसानीची वसुली करण्याबाबतची कार्यपद्धती) एकरूप परिनियम, २०१८ असे म्हणावे.

२. **सक्षम प्राधिकारी.—**कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था किंवा त्यांचे सदस्य, यांच्याकडून अथवा एखाद्या अधिकाऱ्याकडून विद्यापीठाला हानी अथवा नुकसान पोहोचले असेल त्याबाबतीत, हानी किंवा नुकसान वसूल करण्याची कार्यवाही करण्यासाठी कुलगुरू हा सक्षम प्राधिकारी असेल. जर कुलगुरूंच्या कोणत्याही कृतीमुळे विद्यापीठास हानी अथवा नुकसान पोहचले असेल तर, कुलपती हा सक्षम प्राधिकारी असेल.

३. **हानीची किंवा नुकसानीची वसुली करण्याबाबतची कारणे.—**(१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. अधि. क्र. ६) (यात यापुढे या परिनियमामध्ये ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या तरतुदींशी आणि उक्त अधिनियमान्वये काढलेले परिनियम, आदेश किंवा विनियम यांच्याशी सुसंगत नसेल अशी एखादी कृती जेव्हा ती सद्भावनेने केली असेल ती बाब खेरीज करून, संबंधित प्राधिकरण किंवा संस्था किंवा अधिकारी यांच्याकडून, जाणीवपूर्वक किंवा दुर्लक्ष झाल्याने केली गेली असल्यामुळे ; किंवा

(२) तिच्याकडून किंवा यथास्थिति, त्याच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होऊन किंवा त्यांनी कसूर करून उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी आणि उक्त अधिनियमान्वये काढलेल्या परिनियमाशी, आदेशांशी किंवा विनियमांशी सुसंगत अशी कृती करण्यात कसूर केल्यामुळे, विद्यापीठास अशी हानी किंवा नुकसान पोहोचविण्यात आले असल्याचे आढळून आले असेल तर, प्राधिकरण किंवा संस्था, किंवा त्यांचे संबंधित सदस्य, यांच्याकडून संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे अथवा संबंधित अधिकाऱ्याकडून विद्यापीठास झालेली कोणतीही हानी किंवा नुकसान वसूल केले जाण्यास पात्र असेल.

**४. हानी किंवा नुकसान वसूल करण्याबाबतची कार्यपद्धती.—**(१) विद्यापीठाला हानी किंवा नुकसान पोहोचविल्याबाबत प्राधिकरण किंवा संस्था किंवा त्यांचे संबंधित सदस्य यांच्याविरुद्ध किंवा संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकारी, अशा प्राधिकरणाकडून किंवा संस्थेकडून किंवा त्यांच्या सदस्यांकडून हानी किंवा नुकसान वसूल करण्याबाबत किंवा अशा अधिकाऱ्याविरुद्ध प्रथमदर्शनी कार्यवाही सुरू करावी किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी एक समिती नियुक्त करील.

(२) असे प्राधिकरण किंवा संस्था किंवा त्यांचे सदस्य यांच्याकडून झालेली हानी किंवा नुकसान वसूल करण्याबाबत अथवा अशा संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कार्यवाही सुरू करण्याबाबत प्रथमदर्शनी आढळून आले असेल त्याबाबतीत, सक्षम प्राधिकारी, विद्यापीठास झालेल्या हानीची किंवा नुकसानीची वसुली संबंधित व्यक्तीकडून का करण्यात येऊ नये याबाबतची कारणे दाखवा नोटीस तिला लेखी स्वरूपात बजावील. सक्षम प्राधिकारी, ज्या कारणांवरून कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल ती कारणे नोटिशीमध्ये नमूद करील आणि वसुलीची अंदाजित रक्कम, तसेच ज्या कालावधीच्या आत संबंधित व्यक्ती, नोटिशीच्या उत्तरा दाखल तिचे लेखी स्वरूपातील स्पष्टीकरण दाखल करील असा, तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीचा कालावधीही विनिर्दिष्ट करील. ज्यांचा आधार घेण्यात आला आहे अशा संबंधित कागदपत्रांच्या प्रती देखील, कारणे दाखवा नोटिशीसोबत दोषारोपी व्यक्तीस पुरविण्यात येतील.

(३) असे लेखी स्वरूपातील स्पष्टीकरण प्राप्त झाल्यावर किंवा खंड (२) अन्वये बजावलेल्या कारणे दाखवा नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकारी, दोषारोपी व्यक्तीला, विद्यापीठाला झालेली हानी किंवा नुकसान, तिच्याकडून अथवा त्यांच्याकडून संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे का वसूल करण्यात येऊ नये, याबाबत एकतर तिने स्वतः किंवा तिच्या प्रतिनिधीमार्फत, स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी देईल.

(४) कारणे दाखवा नोटीशी सोबतचे लेखी स्पष्टीकरण, कोणतेही असल्यास, सुनावणी दरम्यान केलेले किंवा नोंदविलेले दोषारोपी व्यक्तीचे कथन आणि प्रस्तुत केलेली कागदपत्रे विचारात घेतल्यानंतर, सक्षम प्राधिकारी, दोषारोपी व्यक्तीकडून संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे वसूल करावयाची रक्कम, आणि अशी रक्कम देण्यासाठीचा कालावधी, जो तीस दिवसांपेक्षा कमी नसेल व सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल तो कालावधी निर्धारित करील :

परंतु,—

(क) वसूल करावयाची एकूण रक्कम ही, विद्यापीठास झालेल्या नुकसानीच्या किंवा हानीच्या प्रत्यक्ष रकमेपेक्षा अधिक असणार नाही ;

(ख) वसुली ही, हानीपूरक असेल आणि ती दंड स्वरूपाची असणार नाही ;

(ग) वसुली ही, विद्यापीठाने सोसलेल्या कोणत्याही दूरान्वित किंवा अप्रत्यक्ष नुकसानीसाठी किंवा हानीसाठी केली जाणार नाही.

(५) सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय संबंधित अधिका-यास आणि संबंधित प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या प्रत्येक सदस्याला कळविण्यात येईल.

(६) जेव्हा दोषारोपी व्यक्तीने कथित कृत्याची लेखी रुपात कबुली दिली असेल तेव्हा, खंड (३) व खंड (४) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरावयाची गरज असणार नाही.

(७) अशी वसूल केलेली रक्कम, विद्यापीठाच्या समुचित निधीमध्ये जमा करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**
शासनाचे सह सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 1st January, 2019.

### *NOTIFICATION*

Maharashtra Public Universities Act, 2016.

No. PARINI.2018/C.R. No. 87/VI. SHI. 2.—In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with sub-section (*22*) of section 71 and section 138 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act. No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the uniform Statute, relating to procedure for recovery of damage or loss from an authority or body or members thereof or from an officer, namely :—

UNIFORM STATUTE NO. 2 OF 2019.

1. Short title.—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Procedure for Recovery of Damage or Loss from an Authority or Body or Members thereof or from an Officer) Uniform Statute, 2018.

2. Competent Authority.—The Vice-Chancellor shall be the competent authority to take an action of recovery of damage or loss from any authority or body or members thereof or from any officer for causing damage or loss to the University. If the damage or loss to the University is caused by any action of the Vice-Chancellor, the Chancellor shall be the competent authority.

3. *Grounds for Recovery of Damage or Loss*.—Any damage or loss to the University shall be liable to be recovered from the authority or body or the concerned members thereof, jointly or severally, or from the officer concerned, if it is found that such damage or loss has been caused to the University—

(1) by any action, wilful or negligent, on the part of the authority or body or officer concerned, which is not in conformity with the provisions of Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act. No. VI of 2017) (hereinafter in this statute referred to as the "said Act") and the Statutes, Ordinances or Regulations, issued under the said Act, except when done in good faith ; or

(2) due to failure to act in conformity with the provisions of the said Act and the Statutes, Ordinances or Regulations, issued under the said Act, by wilful neglect or default on its or his part, as the case may be.

4. *Procedure for Recovery of Damage or Loss*.—(*1*) On a complaint being received against the authority or body or the concerned members thereof, or against the officer concerned, of having caused damage or loss to the University, the competent authority shall appoint a committee to determine whether there is a *prima facie* case for initiating an action of recovery of damage or loss from such authority or body or members thereof, or against such officer.

(*2*) In case it is found that a *prima facie* case for initiating an action of recovery of damage or loss from such authority or body or members thereof, or against such officer concerned exists, the competent authority shall issue a notice in writing to the person concerned, to show-cause as to why the damage or loss caused to the University shall not be recovered from him. The competent authority shall mention in the notice, the grounds on which it proposes to take the action and shall also specify the estimated amount of recovery and the period, being a period which shall not be less than thirty days within which the person concerned shall file his written explanation in reply to the notice. Copies of relevant documents which have been relied upon, shall also be supplied to the alleged person along with the show-cause notice.

(*3*) On receipt of such written explanation or on expiry of the period specified in the show-cause notice issued under clause (2), the competent authority shall offer a fair opportunity to the alleged person to explain, either on his own or through his representative, why the damage or loss caused to the University be not recovered from him or from them, jointly or severally.

(*4*) After taking into consideration the written explanation, if any, to the show-cause notice, the statements of the alleged person, made and recorded during the course of hearing and the relevant documents, the competent authority shall determine the amount to be recovered from the alleged person, jointly or severally, and the period within which such amount shall be paid, which shall not be less than thirty days and more than six months :

Provided that,—

(*a*) the total amount to be recovered shall not exceed the actual amount of the loss or damage caused to the University ;

(*b*) recovery shall be compensatory and not penal in nature ;

(*c*) recovery shall not be made for any remote or indirect loss or damage sustained by the University.

(*5*) The decision of the competent authority shall be communicated to the concerned officer and every member of the concerned authority or body.

(*6*) The procedure prescribed in clauses (3) and (4) need not be followed when the person alleged admits the alleged act in writing.

(*7*) The amount so recovered shall be deposited in the appropriate fund of the University.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SIDHARTH KHARAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.